आर.सी.सी.१०३८/२०२०
निशाणी क्र – १७.

सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१.ची साक्ष
देवा शपथ खरे सांगेण की,

नाव : नुतन अशोक शिवरकर,
वय : ५२ वर्षे, धंदा : काही नाही,
राहणार : वानवडी, पुणे.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती आम्रपाली कस्तुरे :-**

सन २०१४ मध्ये मी बी-५०२ दयानंद गार्डन वानवडी पुणे येथे राहत होते. त्यावेळी सोसायटी चेअरमन आरोपी क्र.१ होते व सेक्रेटरी आरोपी क्र.२ होते. सन २०१४ मध्ये सोसायटीच्या सार्वजनिक कल्बमध्ये कोजागिरीचा कार्यक्रम होता. त्या ठिकाणी बसले होते व माझ्या शेजारी आरोपी क्र.२ येऊन बसले व मला म्हणाले की, तुम्ही खुप सुंदर दिसता, मला तुमच्याशी दोस्ती करायची आहे. त्यामुळे मला लज्ञा उत्पन्न झाली व मी तेथून उठून दुसरीकडे बसले. मी आरोपी क्र.२ ला समज दिली. परंतु आरोपी क्र.२ ने आपल्या पदाचा गैरवापर करुन मला वेळोवेळी सोसायटीच्या ऑफीसमध्ये बोलावायचे व अश्लील हावभाव करायचे व बोलायचे. आपल्या पदाचा गैरवापर करुन आरोपी क्र.२ ने सन २०१४ ते सन २०१९ याकालावधीमध्ये मला त्रास दिला. सदर सोसायटीमध्ये माझी सदनिका असून ती माझ्या व माझ्या पतीच्या नावावर आहे. आरोपी क्र.१ व २ हे केवळ मलाच जाणून बूजून त्रास देत होते व नोटीस पाठवित होते. ती नोटीस माझ्या नावे येत होती.

२. दि.२०.०६.२०१९ रोजी मी इंटरनेटचे कनेक्शन घेतले होते. तसेच कोव्हीडचे सर्व नियम पाळले होते. त्याकरीता मी आरोपी क्र.१ ला फोन केला होता. परंतु त्यांनी माझा फोन घेतला नाही. त्यानंतर मी आरोपी क्र.२ ला फोन केला. परंतु त्यांनी तुम्ही आता कनेक्शन घेऊ शकत नाही. परंतु त्यांनी मी फोन केला त्याच्या आदल्या दिवसापर्यंत १८ इंटरनेट कनेक्शन दिले होते. मी सोसायटीला इंटरनेट कनेक्शन करीता रितसर अर्ज केला होता. त्यानंतर मी कनेक्शन घेतले. आरोपी क्र.१ व २ यांनी सोसायटीच्या मायगेट अॅपवर तसेच सोसायटीच्या नोटीस बोर्डवर माझे नावे नोटीस लावली की, मी दादागिरी करुन इंटरनेट कनेक्शन घेतले आहे. ती नोटीस आल्यानंतर मी आरोपींना आपण एका सोसायटीमध्ये राहतो

अशी समज दिली. दि.२२.०६.२०१९ रोजी व मी वानवडी पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द तक्रार दिली. त्यानंतर मी सोसायटीमध्ये सन २०२२ मध्ये धनादेश देण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे मॅनेजर तुषार जाधव होते. त्यांनी सांगितले की, त्यांना आरोपी क्र.१ ने धनादेश घरी आणुन देण्यासाठी सांगितला व मी तो घेऊ शकत नाही. तो धनादेश मी सोसायटीच्या लेटरबॉक्समध्ये टाकला. धनादेशाचा विषय तेथेच संपला. सोसायटीचे सुरक्षा रक्षक नाना होते व ते मला म्हणाले की, आरोपी क्र.१ व २ येता जाता तुमची चौकशी करतात तुम्ही कधी आले व कधी गेले. एक दिवस मी सोसायटीमध्ये संध्याकाळी ०६.३० ते ०६.४५ चे दरम्यान वार्कींग करीत होते. त्यावेळी आरोपी क्र.१ तिकडे उभे होते. ते मला म्हणाले मी तुमच्यासोबत वार्कींगला येऊ का तसेच तुम्ही खूप सुंदर दिसता व माझी बायको तुमच्या सारखी नाही. तसेच त्यांनी देखेगे भी और दिखायेगे भी अशी शेरो शायरी केली. त्यावरुन मला आरोपी क्र.१ चा हेतू कळाला. त्या वाक्यामुळे लज्जास्पद वाटले. ती घटना मी माझ्या मुलीला सांगितली. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. आता मला तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे . त्याला नि.क्र.१८ देण्यात येते. आता मला छापील एफआयआर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला नि.क्र.१९ देण्यात येते. आता मला दि.१४.०६.२०२० व दि.२०.०९.२०२० च्या नोटीस दाखविण्यात आल्या. सदर नोटीसीवर चेअरमन, सेक्रेटरी व माझी सही आहे. त्याला ओळखीकरीता नि.क्र.२० व २१ देण्यात येते. आरोपी क्र.१ व २ आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री यु.एल.निबांळकर यांचेमार्फत -</u>**

आरोपी क्र.२ हे त्यांची पत्नी व दोन मुलांसोबत सोसायटीमधील ए-विंगमधील त्यांचे सदनिकेत राहतात. आरोपी क्र.२ यांची पत्नी गृहिणी किंवा नोकरी करते यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.२ यांची पत्नी कोण आहे यांची मला माहिती आहे. माझे आरोपी क्र.२ च्या पत्नीसोबत सोसायटीच्या आवारात भेटल्यानंतर बोलणे होते नसे. आरोपी क्र.२ चे आई-वडील आरोपी क्र.२ चे घरी येत जात होते अगर कसे यांची मला माहिती नाही. साक्षीदार सांगते की, आरोपी क्र.२ चे वडीलांचे निधन झालेले आहे. आरोपी क्र.२ ची पत्नी शिकवणी घेते अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.२ नोकरी करतात अगर कसे यांची मला

माहिती नाही.

२.  आरोपी क्र.१ सेवानिवृत झाले आहेत यांची मला ऐकीव माहिती आहे. आरोपी क्र.१ सेवानिवृत्त झाल्यानंतर कायमस्वरुपी सोसायटीमध्ये राहायला आले अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ बॅकेत नोकरीला होते अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ सोबत त्यांची पत्नी राहते. आरोपी क्र.१ ला किती मुले आहेत यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ यांची मुले बाहेर देशात असतात व आरोपी क्र.१ त्यांच्याकडे जातात ही माहिती न्यायालयात आल्यांनतर समजली. सन २०१७ साली आरोपी क्र.१ यांच्या सेवानिवृतीचा कार्यक्रम झाला होतो अगर कसे यांची मला माहिती नाही. आरोपी क्र.१ यांच्या पत्नीला मी ओळखते. आरोपी क्र.१ ची पत्नी सोसायटीमधील महिलांच्या कार्यक्रमांना येत होत्या. आरोपी क्र.१ व २ हे मुळचे वानवडी येथील रहिवासी नाहीत अगर कसे यांची मला माहिती नाही.

३.  मी दहावी पास आहे. मी भवानी पेठ पुणे येथे शिक्षणासाठी राहत होते. माझे पहिले ते दहावीपर्यतचे शिक्षण भवानी पेठ पुणे येथे झाले. माझे लग्न सन १९८९ साली झाले. **(आरोपीतर्फे वकीलांनी प्रश्न विचारला की, साक्षीदाराचे सासर वानवडी येथील आहे. सदर प्रश्नाला अभियोग पक्षातर्फे हरकत घेण्यात आली की, घटनेशी या प्रश्नांचा संबंध नाही. त्याबाबत आरोपीतर्फे वकीलांना विचाराणा केली असता, त्यांनी मी सदर प्रश्न का विचारण्यात येत आहे हे मी डिफेन्स ओपन होईल म्हणून मी सांगू शकत नाही व लेखी स्वरुपात देऊ शकतो असे सांगितले. परंतु भारतीय पुरवा कायदा १८७२ मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे सदरचा लेखी युक्तीवाद ग्राहय नाही व खारीज करण्यात येतो.)** माझे सासर मुळ वानवडी येथील रहिवासी आहे.

४.  माझ्याकडे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे महिला शहर उपाअध्यक्ष हे पद होते. त्याचप्रमाणे इकबाल शेख यांच्याकडे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष अल्पसांख्याखकचे पुणे शहर अध्यक्ष हे पद होते. माझी इकबाल शेख यांच्यासोबत राजकारणामुळे ओळख झाली. मी महिलांसाठी चांगले कामे करते म्हणून मला महिला शहर उपाअध्यक्ष हे पद देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे महिलांच्या प्रश्नासंदर्भात माझे सरकारी कार्यालय व पोलीस ठाण्यात येणे

जाणे होते. हे म्हणणे खरे आहे की, मी महिलांचे कौटुंबिक वाद विवाद मिटवीत होते. हे म्हणणे खरे आहे की, वानवडी भागातील बाळासाहेब शिवरकर हे नगरसेवक, आमदार व मंत्री होते. बाळासाहेब शिवरकर हे मला ओळखतात. सोसायटीमधील सदस्य व महिला मी राजकारणात असल्यामुळे माझ्याकडे समस्या घेऊन येत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या व्यस्त कामामुळे मला सोसायटीतीतील कार्यक्रमांना वेळ देणे शक्य होते. साक्षीदार स्वताःहुन सांगते मी सवडीनुसार कार्यक्रमाला जात होते.

५. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीमध्ये स्वतंत्र सांस्कृतिक समिती आहे. त्या समितीकडे सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन खर्च इत्यादीची माहिती असेल. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीच्या कार्यक्रमामध्ये अनेक व्यक्ती त्यांच्या मोबाईलमध्ये कार्याक्रमांचे फोटो घेत असतात. बी-विंगमधील महिला माझ्या मैत्रीणी नाहीत. सोसायटीमधील माझ्या ओळखीच्या महिलासोबत माझे चांगले संबंध आहेत. सोसायटीतील कार्यक्रमांसाठी ज्या माहिला येतात त्यातील माझ्या ओळखीच्या महिला माझेसोबत गप्पा मारतात व मी एकत्रात कार्यक्रमाला हजेरी लावते. हे म्हणणे खरे आहे की, सोसायटीमधील कार्यक्रमांना संभासदाचे कुटूंबिय येत असतात. सोसायटीच्या कार्यक्रमांना महिला व पुरुषांना बसण्यासाठी व्यवस्था करावी लागते. पावसामुळे अगर कोव्हीडच्या काळात सोसायटीचे कार्यक्रम रद्द करावे लागत होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१४ मध्ये आमच्या सोसायटीत कार्यक्रम झाले नव्हते.

**उटलतपास तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यत तहकूब करण्यात येत आहे.**

समक्ष,

सही/-
(अ.अ.कुलकर्णी)
२रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक : २३/१२/२०२४.